# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : १५/०८/२०२३

# प्रेसनोट

दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा ७६ वा वर्धापन दिन समारंभ महापालिका आयुक्त मा. श्री. अजीज शेख यांच्या नियंत्रणाखाली उल्हासनगर महानगरपालिकेत मोठ्या जल्लोशात साजरा करण्यात आला.

सकाळी ८:०० वाजता महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात झेंडावंदन, राष्ट्रगीत व राज्यगीत झाल्यानंतर मा. आयुक्तांनी महापालिकेच्या विविध विभागामार्फत राबविण्यात आलेले उपक्रम, प्रकल्प, विकासकामे इ. बाबत माहिती करून दिली. त्यानंतर मा. महासभा सभागृहात स्वातंत्र्य सैनानी व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचा सत्कार करून त्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी श्री. रमेश आव्हाड, महापालिका कर्मचारी यांनी "शूर आम्ही सरदार" हे प्रसिद्ध गीत गाऊन उपस्थितांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. तसेच महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणातील शिलाफलकाचे अनावर महापालिका आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले.

सकाळी १०:०५ वाजता गोल मैदान येथील ११० फुट उंच राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. महापालिका मुख्यालय व गोल मैदान येथील दोन्ही कार्यक्रमात सुरक्षा रक्षक, अग्निशमन दलाची परेड अग्निशमन अधिकारी श्री. बाळू नेटके यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली चोख घेण्यात आली.

मा. आयुक्तांच्या हस्ते गोल मैदान, उल्हासनगर-१, शाळा क्र.१४, प्रभाग समिती क्र.४ येथील नेताजी चौकात व पोस्ट ऑफिस, उल्हासनगर-५ येथील शिलाफलकांचे अनावरण करण्यात आले. तसेच व्ही.टी.सी. मैदान येथील अमृतवाटिकेचे उद्घाटन करून वृक्षारोपण करण्यात आले व येथील विकास कामाची पाहणी मा. आयुक्त श्री. अजीज शेख यांनी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ. करूणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. अशोक नाईकवाडे, उप-आयुक्त (आरोग्य) डॉ. सुभाष जाधव, महापालिका सचिव सौ. प्राजक्ता कुलकर्णी व इतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सौ.छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी यांनी सर्व कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले.

विठ्ठवाडी स्टेशन येथील वेदांत कॉलेजमधील काही धाडसी विद्यार्थ्यांनी तोरणा गड ते उल्हासनगर पर्यंत पायी चालत “क्रांती दौड” आयोजित केली होती. सदरचा प्रवास त्यांनी अवघ्या २० तासांत पार केल्याचे “क्रांती दौड” चे प्रमुख यांचेकडून सांगण्यात आले व त्यांनी सदरच्या प्रवासात घडलेल्या महत्वपूर्ण घटनांचे व अडचणींचे वर्णन महापालिका आयुक्त व इतर अधिकारी यांचे समोर केले. सदरच्या धाडसी उपक्रमास मा. आयुक्तांनी विशेष दाद देऊन “क्रांती दौड” मध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा गौरव केला.

सदर कार्यक्रमास मा. आमदार श्री. कुमार आयलानी, मा. माजी नगरसेवक श्री. राजू जग्यासी यांनी उपस्थिती दर्शविली. तसेच महापालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सदर कार्यक्रमास उस्फुर्त प्रतिसाद देत फारच मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी झाल्याने महापालिकेचा परिसर अक्षरश: गजबजून गेला होता.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.